<u>नि. फौ. ख. क्र.१३४/२०१९</u> निशाणी ३६

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – देवराव गणपत वानखडे

वय – ६५ वर्षे, व्यवसाय – गुरे चारणे,

पत्ता – मांडोली, ता. बाळापूर, जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. दि.२५.१०.२०१८ रोजी मी मांडोली गावामध्ये गुरे चारण्याकरीता पंचफुलाबाई हिच्या घराच्या जवळ होतो. त्या दिवशी ११ वा. सुमारास शिवाजी होनाळे व भाना होनाळे हे ट्रॅक्टरमधून कुटार घेवून पंचफुलाबाई हिच्या घरी आले होते व ते कुटार खाली करीत होते. त्यावेळी शिवाजी होनाळे हे सदरचे कुटार हे बाईच्या खोलीमध्ये भरतो असे म्हणाले त्यावेळी पंचफुलाबाई हिने त्यांना नाही म्हटले. त्यावेळी शिवाजी होनाळे हा पंचफुलाबाई हीस म्हणाला की, मी पोलीस पाटील आहे मी काही भीत नाही. त्यानंतर देखील पंचफुलाबाई हिने त्याचे काही ऐकले नाही. त्यानंतर शिवाजी होनाळे याने त्याच्या हातातील विळा पंचफुलाबाई हिच्या डाव्या हातावर मारला, तो विळा तिच्या अंगठ्याच्या येथे लागला व तिला जखम झाला. तसेच शिवाजी होनाळे याने पंचफुलाबाई हीस शिवीगाळ केली. त्यानंतर मी भांडण आवरण्याचा प्रयत्न केला, परंतु तो आवरला नाही, म्हणून मी तेथून निघून गेलो. ज्या विळाने पंचफुलाबाई हिस मारहाण केली तो पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता मला आर्टीकल १ कडील लोखंडी विळा दाखविण्यात आला, तो तोच आहे. आरोपी क्र.१ आज न्यायालयात हजर असल्याबाबत साक्षीदार यांनी सांगितले. आरोपी क्र.२ च्या ओळखीबाबत कोणताही वाद उपस्थीत नाही. सदर घटनेबाबत पोलीसांनी माझी चौकशी केली होती.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती एच. बी. टिकार यांचे मार्फत उलटतपासः</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, पंचफुलाबाई व मी आज न्यायालयात एकत्र आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचफुलाबाई माझी नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की,

पंचफुलाबाई व मी एकाच घरामध्ये राहतो. शिवाजी होनाळे यांने पंचफुलाबाई यांच्या विरोधात शेती वादाबाबतची केस न्यायालयामध्ये सुरु आहे अथवा नाही, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, कुटार हे जानेवारी महिन्यामध्ये तयार होते, मी स्वतःहून सांगतो की, कुटार मार्च महिन्यामध्ये तयार होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचफुलाबाई ही नेहमी शेतीचे निंदण व मजुरी कामाकरीता दुसऱ्याच्या शेतामध्ये जाते. मी स्वतःहून सांगतो की, मी पंचफुलाबाई ही स्वतःच्या शेतामध्ये काम करायला जाते. हे म्हणणे खरे आहे की, ती तिच्या शेतातील विळाण्याने कापणी, निंदण काम ती स्वतः करते.

३. मी गुरे चारण्याचे काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, त्याकरीता मी सकाळी ९–१० वा. गुरे घेवून जातो व संध्या. ५–६ वा. घरी येतो. हे म्हणणे खरे नाही की, पंचफुलाबाई हिने शिवाजी होनाळे याच्या शेतामध्ये अतिक्रमण करुन घर बांधलेले आहे. मी माझा जबाब देताना पोलीसांना "मी पोलीस पाटील आहे मी काही भीत नाही"’ हा मजकूर सांगितला होता. सदरचा मजकूर हा जबाबात का लिहीलेला नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, कुटार टोपल्यानी खाली केले जाते. ज्या विळ्याने आरोपीने पंचफुलाबाई हिस तथाकथित विळ्याने मारहाण केली होती, त्यावर असलेली ओळखीकरीता असलेली निशाणी मी पाहिलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात पंचफुलाबाई हिच्या सांगण्यानुसार साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही मारहाणीची घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– १३.०३.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.03.13 14:51:29 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १३.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १३.०३.२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १३.०३.२०२६ |